महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पणे विभागीय मंडळ. पणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

कालमर्यादित/परीक्षा प्राधान्य

पत्र क्र.पुविमं/पी-१ शाखा/फेब्रु-मार्च -२०२६/ 233
पुणे-४११००५
दिनांक. ०७ /०१/२०२५
१२/०१/२०२६

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
पुणे/अहिल्यनगर/सोलापूर.

विषय:-माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) फेब्रु-मार्च -२०२६ पूर्व व्यावसायिक विषय कोड X1,91,92,93 या विषयाच्या प्रात्यक्षिक परीक्षेबाबत...

संदर्भ:-१. राज्य मंडळ पत्र क्र.रा.मं/परीक्षा-६/४५०१ दिनांक १८/१२/२०२५ रोजीचे पत्र.
२.क्र. रा.म./परीक्षा-३/४५५० दिनांक २३/१२/२०२५ रोजीचे पत्र.
३.क्र. रा.मं/परीक्षा-३/४५५१ दिनांक २३/१२/२०२५ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये ०१ ते ०३ नुसार आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) फेब्रु-मार्च- २०२६ पूर्व व्यावसायिक विषय कोड X1,91,92,93 या विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा सोमवार **दिनांक ०२/०२/२०२६ ते बुधवार दिनांक. १८/०२/२०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. तसेच मंडळाने निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थी वैद्यकीय/अन्य अपरिहार्य कारणामुळे प्रात्यक्षिक परीक्षा देऊ न शकल्यास अशा विद्यार्थ्यांची आऊट ऑफ टर्न परीक्षा लेखी परीक्षेनंतर शुक्रवार दिनांक २०/०३/२०२६ ते सोमवार दिनांक २३/०३/२०२६ व मंगळवार दिनांक २४/०३/२०२६ या कालावधीत घेण्यात यावी.** सदर विषयांच्या प्रात्याक्षिक परीक्षेकरिता अंतर्गत व बाहयपरीक्षक नेमणूक करण्यात येणार आहे. बाहयपरीक्षकांची नियुक्ती महाराष्ट्र राज्य कौशल्य,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ(MSBSVET)या कार्यालयामार्फत करण्यात येणार आहे. फक्त अंतर्गत परीक्षक नेमणूकीकरिता प्रचलित पध्दतीने ज्या शाळांचे विद्यार्थी सदर विषयांसाठी प्रविष्ठ झालेले आहेत. अशा शाळांनी आपल्या शाळेत सद्य:स्थितीत विषय कोड X1,91,92,93 या विषयांसाठी कार्यरत असलेल्या शिक्षकांची अंतर्गत परीक्षक म्हणून आपल्या स्तरावर नेमणूक करावी व केलेला नियुक्ती अहवाल (परीक्षकांची पात्रता व भ्रमणध्वनीसहित) मंडळ कार्यालयास तात्काळ **(दिनांक.२०/०१/२०२६ पर्यंत) sscboardpune@gmail.com ईमेलद्वारे कळवावा.** सदर अंतर्गत नेमणुकीची माहिती परीक्षा समन्वयकांना कळवावयाची असल्याने याबाबत त्वरित कार्यवाही करावी. अन्यथा सदर विषयाच्या प्रविष्ठ विदयार्थ्यांबाबतच्या कार्यवाहीसाठी आपली शाळा सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

MBRaut
(श्रीम. मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,(प्र)
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५

प्रत माहितीस्तव,
१) मा. सचिव, राज्यमंडळ,पुणे-०४
२) मा. विभागीय शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग, पुणे-१
३) शिक्षणाधिकारी(माध्य),पुणे/अहमदनगर/सोलापूर